# जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ
# लिपीक-टंकलेखक व तलाठी पद भरती

**जाहिरात क्रमांक- अका/आस्था/कावि-५९७/२०१०, दि. ३१ मार्च २०१०**

जिल्हाधिकारी,यवतमाळ यांच्या आस्थापनेवरील गट-क " लिपिक-टंकलेखक " व जिल्हाधिकारी,यवतमाळ यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील गट-क "तलाठी " संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेद्वारे निवड करण्या करिता अर्ज मागविण्यात येत आहे.

**१) अर्ज मागविणे यादी प्रसिध्द करणे, लेखी परीक्षा, निवड यादी प्रसिध्द करणे इ.चा कालबध्द कार्यक्रम :**

| | |
|---|---|
| अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख | १७ एप्रिल २०१० सायंकाळी ५.३० पर्यंत |
| पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | ५ मे २०१० |
| प्रसिध्द केलेल्या यादीवर आक्षेप नोंदविण्याची मुदत | ६ मे ते १० मे २०१० |
| आक्षेपाची नोंद घेऊन अंतिम यादी यादी प्रसिध्द करणे | १५ मे २०१० |
| लेखी परीक्षा दिनांक | १३ जुन २०१०<br>तलाठी सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत<br>लिपीक-टंकलेखक दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत |
| परीक्षेचा जाहिर करणे | २१ जुन २०१० |
| निवड यादी जाहिर करणे | २२ जुन २०१० |
| प्रसिध्द केलेल्या निवड यादीवर आक्षेप नोंदविण्याची मुदत | दिनांक २३ जुन ते २४ जुन २०१० सायंकाळी ५.०० पर्यंत |
| आलेल्या आक्षेपावर नियमानुसार कार्यवाही करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | २५ जुन २०१० |

टिप :- पात्र /अपात्र उमेदवारांचे प्रसिध्द केलेल्या यादीत डाटा एंन्ट्री मध्ये नाव शैक्षणीक अर्हता,पत्ता,सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, इ. मध्ये अर्जानुसार चुक असल्यास उमेदवारांनी याबाबत लेखी आक्षेप अर्ज अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ यांचेकडे समक्ष सादर करावेत. तसेच निवड यादी संदर्भात आक्षेप घ्यावयाचे असल्यास सबंधीत उमेदवारांनी सदर आक्षेप अर्ज निवासी उपजिल्हाधिकारी,यवतमाळ यांचेकडे समक्ष सादर करावेत. पोष्टाने, फॅक्स द्वारे किंवा इतर मार्गाने प्राप्त होणा-या आक्षेप अर्जांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**२) रिक्त पदाचा तपशिल व वेतनश्रेणी :**

**२.१) तलाठी** (वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड वेतन रु. २४०० )

| प्रवर्ग | एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदविधर/ पदविकाधारकर अशंकालीन | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| अजा | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ |
| अज | ४ | १ | १ | ० | ० | ० | १ | १ |
| विजा (अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भज (ब) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भज (क) | ३ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भज (ड) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इमाव | १४ | ४ | २ | १ | २ | ० | १ | ४ |
| खुला | ४१ | १२ | ६ | २ | ४ | १ | ४ | १२ |
| एकुण | ७० | २० | १० | ३ | ६ | १ | ७ | २३ |

**२.२) लिपीक-टंकलेखक** (वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड वेतन रु. १९०० )

| प्रवर्ग | एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | अपंग | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | पदविधर/ पदविकाधारकर अशंकालीन | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अजा | ९ | ३ | १- पद क्षीणदृष्टी (Low vision ) व १- पद श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment ) | १ | ० | ० | ० | १ | ४ |
| अज | ५ | १ | | १ | ० | ० | ० | १ | २ |
| विजा (अ) | २ | १ | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भज (क) | २ | १ | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भज (ड) | १ | ० | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| विमाप्र | २ | १ | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| खुला | २७ | ८ | | ४ | १ | १ | १ | ३ | ९ |
| एकुण | ४८ | १५ | | ६ | १ | १ | १ | ५ | १९ |

**टिप :-** सामान्य प्रशासन विभागा शासन परिपत्रक क्र.न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र.१०३ (भाग-३) १६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील निर्देशानुसार अपंगाची आरक्षीत पदे सरळसेवेने भरतांना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वंतत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगाची पदभरती करण्याची कार्यवाही करावी मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते सामाजिक प्रर्वगात असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्याबाबत निर्देश आहेत. त्यामुळे यानुसार कार्यवाही करतांना गुणवत्तेनुसार अपंग उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गात त्यांचे समांतर आरक्षण दर्शविल्यानंतर रकाना क्र.१० मध्ये दर्शविलेल त्या सामाजिक प्रवर्गाचे पद कमी होईल.

**३) शैक्षणीक अर्हता :**

| | |
|---|---|
| तलाठी पदा करिता | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| लिपिक - टंकलेखक पदा करिता | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण असणे आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.आवश्यक |

**४) वयोमर्यादा :**

दिनांक १५.४.२०१० रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच खालील नमुद पात्र प्रवर्गातील उमेदवारांना शासन तरतुदीनुसार त्यांचे समोर दर्शविलेल्या प्रमाणे उच्च वयोमर्यादेत शिथिलता आहे.

४.१) अपंग उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत.
४.२) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत.
४.३) माजी सैनिक उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत
४.४) पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी : ४६ वर्षापर्यंत.
४.५) खेळाडू उमेदवारांसाठी : ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील
४.६) स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य : ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील

**५) लेखी परीक्षेचे स्वरुप :**

शासन निर्णय दि.१९.१०.२००७ मधील परिच्छेद क्रमांक ५ (४) नुसार २००गुणांची लेखी परीक्षा राहील. लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,समान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवण्यात आले असून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची राहील.

**६) निवड पध्दत :**

उमेदवारांची निवड लेखी परिक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारास एकुण गुणाच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

**७) परीक्षा शुल्क :**

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये २००/- ( रुपये दोनशे फक्त ) व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये १००/- (रुपये शंभर फक्त) इतके परीक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदर शुल्क राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) किंवा बँकर्स चेक ( Banker Chaque) स्वरुपात अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ, यांच्या नावाने यवतमाळ येथे देय असलेले (Payable at Yavatmal) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**८) अर्ज सादर करणेबाबत आवश्यक सुचना :**

जाहीरातीत दिल्याप्रमाणे विहीत नमुन्यातील सिंगल पेज (८.५ x १४) आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एकाच बाजुला संगणकावर तयार केलेला व परीपूर्ण भरलेले अर्ज , जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ या पत्त्यावर डाकेव्दारे पाठविण्यात यावेत किंवा कार्यालयीन वेळेत व दिवशी सकाळी १०.०० ते ५.३० वाजे पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात स्वीकारले जातील. **पोष्टाने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज कार्यालयीन वेळेत व दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक १७ एपिल २०१० सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत प्राप्त व्हावयास पाहिजे**. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही . **पोष्टाने प्राप्त झालेल्या अर्जाच्या विलंबाबाबतची कोणतीही जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहणार नाही याची विशेष नोंद घ्यावी. लिपिक-टंकलेखक व तलाठी या करिता पदनिहाय स्वंतत्र अर्ज करावेत.**

**९) अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्र :**

अर्जासोबत खालील नमुद केल्याक्रमांकनुसार धनाकर्ष, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक राहील. सर्व प्रमाणपत्रे केंद्र/राज्य शासनाने नियुक्त केलले राजपत्रित अधिकारी/पोस्टमास्टर (वर्ग-२ किंवा त्यावरील दर्जाचे) व मुख्याध्यापक (वर्ग-२ किंवा त्यावरील दर्जाचे) अधिकारी यांनी साक्षांकीत केलेले असावेत. तसे नसल्यास अर्ज अपूर्ण आहे असे समजून अर्ज नाकारला जाईल.

९.१) राष्ट्रीकृत बँकेचा धनाकर्ष /बँकर्स चेक(Demand Draft). (**धनाकर्षाच्या मागे उमेदवाराने स्वतःचे संपूर्ण नांव लिहाव)**

९.२) विहीत नमुन्यात अर्ज.

९.३) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (गुणपत्रिका) १०वी/१२वी/पदवी/पदव्युत्तर पदवी.

९.४) पदास आवश्यक असलेले प्रमाणपत्र (टंकलेखन) व असल्याससंगणक प्रमाणपत्र .

९.५) वयासंबंधी दाखल (जन्माचा दाखला/शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र).

९.६) जातीचे प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र.

९.७) अधिवास प्रमाणपत्र.

९.८) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागासवर्ग करीता आवश्यक) **(सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत वैध असणे आवश्यक आहे)** वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

९.९) अपंग/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/माजी सैनिक/अंशकालीन सुशिक्षित बेरोजगार/स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचे पाल्य यांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला जोडावा.

९.१०) खेळाडू या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी जाहिराती मध्ये अट क्रमांक १५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान **राज्य अतिंक्यपद स्पर्धेत प्रथम,द्वितीय अथा तृतीय स्थान प्राप्त केलेले किंवा सुवर्ण,रोप्य किंवा कास्य पदक मिळालेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.**

९.११) पदविधर/पदविधाकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी "सुशिक्षित बेरोजगार"या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्ष काम केल्याचे व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९.१२) सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.

९.१३) लिफाफा(१०.x४से.मि.) स्वतःचा संपुर्ण पत्ता लिहीलेला व त्यावर रुपये ५ पोष्टाचे तिकीट लावालेला.

**१०) सर्वसाधारण शर्ती व अटी :-**

**१०.१)** सदर्हू जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. जाहीरातीत दिनांक ३१ डिसेंबर २०१० पर्यंत सेवानिवृत्ती/पदोन्नतीमुळे व इतर कारणामुळे रिक्त होणारी पदे विचारात घेण्यात आलेली आहेत. सदर पदे जसे-जसे रिक्त होतील, त्यानुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

**१०.२)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.२९.३.२००३ अन्वये निवड झालेल्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या आत कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**१०.३)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीपासून दोन वर्षाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**१०.४)** उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. (अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे )

**१०.५)** उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**१०.६)** जाहीरातीत विहीत केलेल्या नमुन्यातच अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**१०.७)** प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

**१०.८)** उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी अलीकडील काळातील एक पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व फोटोवर तसेच फोटोखाली विहीत चौकटीत स्वतःची स्वाक्षरी करावी.

**१०.९)** महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधीसूचीत जमाती (विमूक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम) हा अधिनियमातील नियम क्रमांक ४(२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक /८२/२००१/मसेआ-००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार महिलांकरीता राखीव असलेल्या पदाचा फायदा घ्यावयाचा आहे त्या महिलांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून महिलांसाठी राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

**१०.१०)** उमेदवारानी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पदस्थापनेत बदल करण्याबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**११)** पात्र/अपात्र उमेदवारांची यादी , लेखी परीक्षेचा निकाल व निवड यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच **<u>www.yavatmal.nic.in</u>** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

**१२)** उमेदवारांना प्रवेशपत्र दिनांक १६ मे २०१० पासून पोष्टाने पाठविण्यात येतील. **ज्या उमेदवारांना लेखी परीक्षा प्रवेशपत्र दिनांक १० जुन २०१० पर्यंत प्राप्त होणार नाही त्यांनी निवासी उपजिलहाधिकारी यांचेकडे प्रवेशपत्र मिळण्याबाबत अर्ज करावा त्यांना दि.११ व १२ जुन २०१० रोजी प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.**

**१३)** उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालय/ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यायल/जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

**१४)** शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

**१५)** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक /रिक्रिधो/२००२/प्र.क्र.६८/प्रियुसे-२, दि.३० एप्रिल, २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत शिथिलता राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत, प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. **<u>गट-क पदासाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्य पद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू असावा</u>**. राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची

असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्या अथवा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलींपिक असोसिएशनने संलग्नता दिलेली असल्यास अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्य स्तरीय विजेत्यांनाही खेळाडूच्या आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. वैयक्तिकरीत्या किंवा आमंत्रितरित्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

**१६)** सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्रमांक प्र.अ.क्र.१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ, दिनांक २६/५/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनीसुध्दा लागू नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे) नमुना जोडला आहे.

**१७)** अपंग व्यक्तीसांठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सक्षम अधिका-याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. अपंगाची आरक्षित पदे शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ नुसार अपंग उमेदवारांची निवड झाल्यानंतर ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्यांना त्या सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षणा अंतर्गत सामावून घेण्यात येईल.

**१८)** माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कार्यालयाकडे नाव नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

**१९)** पदविधर/पदविधाकाधारक अंशकालीन उमेदवारांनी "सुशिक्षित बेरोजगार"या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्ष काम केल्याचे व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**२०)** उमेदवारांना लेखी परीक्षेस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

**२१)** निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच उमेदवाराकडे पदाकरिता आवश्यक अर्हता नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचे पुर्व चारित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**२२)** उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र सोबत जोडावे).शासन परिपत्रक क्रमांक/:बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर २०००९ मधील निर्देशा प्रमाणे मागासवर्गीय संवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

**२३)** शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

**२४)** भरतीप्रक्रियेसंबंधीत देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्ययावत सूचना कार्यालयीन फलकावर व **www.yavatmal.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**२५)** जाहिरातीत नमुद अटीत बदल, जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल वा संपूर्ण भरती प्रकीया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,यवतमाळ यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

यवतमाळ
दिनांक ३१ मार्च २०१०

स्वा /-
**( संजय देशमुख )**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, यवतमाळ**